
# मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना



**संपादक**

**डॉ. भास्कर शेळके**

४६. 'दलित, ग्रामीण कादंबरीतील सामाजिकता'
-प्रा.डॉ.गोपीनाथ बोडखे ३१३
४७. ग्रामीण व दलित कादंबरी - समाजशास्त्रीय आकलन
-डॉ. सुभाष आहेर ३२२
४८. इंग्रजी वाङ्मयातील दलित ग्रामीण कादंबरीतील व्यथा
-प्रा.चंद्रकांत मंडलिक ३२६
४९. १९८० नंतरची ग्रामीण व दलित कांदबरी
-प्रा.एस.बी.रणदिवे ३३१
५०. १९८० नंतरची दलित व ग्रामीण कादंबरी
-प्रा.देविदास शेटे ३४१
५१. मराठी दलित व ग्रामीण कादंबरीतील बदलत्या जीवनाचे चित्रण
-डॉ.बाळासाहेब दिघे, ३४५
५२. दलित व ग्रामीण कादंबरीची भाषा
-डॉ. सारीपुत्र तुपेरे ३५२
५३. दलित, ग्रामीण जाणिवेचे कादंबरीकार : माधव कोंडविलकर
-प्रा.सौ.दीपा कुलकर्णी ३६०
५४. अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांतील ग्रामीण आणि दलित जाणिवा
- प्रा.राजेश्वर दुडूकनाळे ३६५
५५. कादंबरी एक वाङ्:मय प्रकार
-प्रा.सुभाष अडावतकर ३७०
५६. दलित कादंबरी : संकल्पना व स्वरूप
-प्रा. सुहास निर्मळे ३७६
५७. दलित साहित्य
-डॉ.चंद्रकांत रूद्राक्ष ३८२
५८. समकालीन वास्तव व मराठी कादंबरी/ -डॉ. गणेश मोहिते ३८८
५९. ग्रामीण भागातील शैक्षणिक गुणवत्ता सद्यस्थिती आणि उपाय ३९
-प्रा. दीपक बोचरे
६०. दीक्षाभूमी : सामाजिक, धार्मिक, साहित्यिक चळवळीचे प्रेरणास्त्रोत ४
- डॉ.भास्कर शेळके
६१. ग्रामीण व दलित कादंबरीलेखनातील स्त्री साहित्यिकांच्या
अत्यल्प योगदानाचा स्त्रीवादी मागोवा/ -प्रा. शोभा नितर
६२. 'चारापाणी' व 'झावळं' या कादंबऱ्यांचा : एक तुलनात्मक विचार
-डॉ. उगले ए. बी.
६३. समस्याप्रधान दलित ग्रामीण कादंबरी/प्रा.बाळासाहेब वामनराव सोनवणे
६४. ग्रामीण दलित कांदबरीतील स्त्री चित्रण/डॉ. दिलीप अलोणे

# इंग्रजी वाङ्‌मयातील दलित ग्रामीण कादंबरीतील व्यथा

-प्रा. चंद्रकांत मंडलीक

**प्रस्तावना :-**

पददलितांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात न्यायासाठी संघर्षाच्या रुपात दलित वाङ्‌मयाची निर्मिती करून काही संत आणि लेखकांनी उदा. कबीर, रोहीदास, तुकाराम, दादू मालूकम, शहाणोबाई, गुरुनानक, नरसिंह मेहता यांनी पददलितांच्या आवाजाला वाङ्‌मयात टाहो फोडला. व्ही. रामन यांचे 'अच्छुत की शिकायत' हे भोजपुरी भाषेतील सरकारी दप्तरी नोंद झालेले पहिले वाङ्‌मयीन पुस्तक आहे. दलित वाङ्‌मयात अन्यायाने पिडलेल्या व्यक्ती कथेच्या केंद्र स्थानी घेऊन लेखकांनी जुन्या परंपरांना शह देऊन नवीन मूल्य प्रस्थापित करणे, जातीयवाद नष्ट करून नविन समाजाची निर्मिती, सनातन विचारांना मूठमाती देऊन नवीन संकल्पना निर्माण करणे त्याचबरोबर दलितांना मानाचा दर्जा देऊन स्वातंत्र्य, समता आणि बंधूता, या विचारांचा प्रसार व प्रचार करण्याचे मोलाचे काम केले.

दलित वाङ्‌मयाचा विचार करण्यापूर्वी दलित कोणास म्हणावे यावर प्रकाश टाकणे महत्त्वाचे आहे. दलितांमध्ये अनुसूचित जाती आणि जमाती व नवबौद्ध यांनांच संबोधित करणे योग्य ठरणार नाही तर भूमीहीन, गरीब, होतकरु लोक राजकीय, आर्थिक व धार्मिकतेच्या नावाखाली ज्या महिलांचे शोषण करण्यात आले इत्यादींना दलित समजावे असे सांगितले आहे. (महिदा, २०११:१४)

दलित ही संज्ञा जातीशी संबंधित नाही. पाश्चिमात्त्य राष्ट्रांमध्ये अस्पृश्यानांच दलित समजले आहे. महाराष्ट्रात एकूण अनुसूचित जातींची संख्या ५९ असून त्यात मुख्यत्त्वे महार, मातंग, चर्मकार ह्या जाती संख्येने जास्त असून ढोर, होलार, खाटिक, कैकाडी, डोंब, मेडगी, इ.जातींचा समावेश केलेला आहे. (वराडकर, १९०८:१.८) या जातीमध्ये संख्येने महार ही सर्वात मोठी जात आहे. हरिजन ही संज्ञा अस्पृश्याकरिता महात्मा गांधीजींनी प्रथम प्रस्तापित केली. त्याचा अर्थ 'Children of God' विष्णूचे दुसरे नाव हरी असून म्हणजेच मित्रत्त्व होय.

दलित कुटुंबात जन्माला आलेला किंवा दलितत्तेर व्यक्तिने दलितांवर

लिहिलेल्या कलाकृती दलित वाङ्मय म्हणायचे का? असा प्रश्न उपस्थित होतो. ब्राम्हण व्यक्तिने दलितांच्या संदर्भात घडलेल्या घडामोडीवर आधारित काव्य, कथा, अथवा कादंबरी लिहिली असेल तर त्यास दलित वाङ्मय म्हणता येईल का? अनंत मुर्तीनी लिहीलेल्या 'संस्कारा' कादंबरीत अस्पृश्यतेचा उहापोह केलेला दिसतो. त्याचबरोबर अनेक दलित व दलितेतर साहित्यिकांनी साहित्याची निर्मिती केलेली आहे; आणि त्यास जगत मान्यता मिळालेली आहे. अनंतमुर्ती हे कॅनडातील बधम्हण कुळातील असल्याने मग त्यांच्या 'संस्कारा' या कादंबरीस दलित वाङ्मयाचा दर्जा देणे योग्य होईल का? दलित लेखकांच्या सभेने मात्र दलित कुटुंबात जन्मलेल्या व्यक्तीने दलितांवर वाङ्मय निर्मीती केली असेल तर त्यास दलित वाङ्मय म्हणूनच संबोधावे असे म्हटले आहे. दलितांच्या वेदना दलितेतर व्यक्तिला समजू शकत नाही याचा आधार देण्यात आलेला आहे.

वाङ्मयात समाजातील लोकांचे दैनंदीन जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. समाजात अशांतता, असमानता, अन्याय इत्यादीमुळे भेदभाव निर्माण झालेला असून दलितांना तुलनेने जास्त भेदभाव सहन करावा लागत आहे. या सर्वांचा परीपाकातूनच २० व्या शतकाच्या शेवटी दलित वाङ्मयाची निर्मीती मराठी, गुजराथी, हिंदी, कन्नडा, बंगाली, पंजाबी इ. भाषेत झाली.

परंपरागत वाङ्मयात राजे, राणी व प्रगत लोकांच्या जीवनाचे चित्रण करण्यात येत असून पददलितांच्या दुःखाना वाचा फोडलेली दिसत नाही. जातीवर आधारीत भेदभावास शंबुका, करण, एकलव्य आणि आंबेडकरांना देखील दुःखाच्या मार्गातून प्रवास करावा लागलेला आहे. कबीर, रोहीदास, तुकाराम, मलुक, गुरुनानक, नृसिंह मेहता यासारख्या संतांनी दलितांची दुःखे वाङ्मयातून मांडण्यास सुरूवात केली.

'अच्छुत की शिकायत' या पुस्तकाने दलित वाङ्मयाची सुरूवात झाली. स्वातंत्र्याच्या अनेक वर्षानंतर देखील जाती धर्मावर आधारित वर्ण व्यवस्था चालूच राहीली. गौतम बुद्ध, गांधीजी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भारत देशातील नविन समाज निर्मितीत महत्त्वाचे योगदान असले तरी सद्यस्थितीत मनु व मनुस्मृतीच्या मार्गाने निर्माण झालेली जाती व्यवस्था जिवंत असल्याचे लक्षात येते. पददलितांना सस्पृश्यतेची वागणूक दिली जात असून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दुर ठेवलेले आहे, आणि म्हणूनच दलित वाङ्मय हक्क व मानवी मुल्यांचा पुरस्कार करताना दिसते.

भारतीय वाङ्मयात प्रामुख्याने राजाराम मोहन रॉय श्री.अरविंद घोष, सरोजीनी नायडू, रविंद्रनाथ टागोर, डॉ. राधाक्रीशनन, डॉ.मुल्क राज आनंद, गिरीश कर्नाड, आर.के. नारायण, निराड चौधरी, खुशवंत सिंग आणि अरुणंधती रॉय यांचा सामाजिक व सांस्कृतिक चळवळीचा जवळचा संबंध असून पददलितांचे जीवन, त्यांच्या वेदना, असमानता,त्यांच्या वाङ्मयातून कथित झालेली आहे. मुल्कराज आनंदाच्या 'अनटचेबल' या कादंबरीतून प्रथमच दलितासंबंधीच्या घटनाचे स्पष्टीकरण करण्यास सुरूवात झालेली दिसते.

मुल्कराज आनंदानी 'कुली' (१९३६) 'द व्हिलेज' (१९३९) 'दि रोड' (१९६१) या कादंबऱ्यातून दलितांच्या शोषणावर प्रकाश टाकलेला आहे. 'अनटचेबल' (१९३५) या कादंबरीचे जवळजवळ ३० भाषांमध्ये भाषांतर झाले असून त्यामध्ये 'बाखा' या दलित मुलाला सवर्णाकडून केवळ दलित असल्यामुळे शिव्याशापास सामोरे जावे लागत असल्याचे दिसते.

'बाखा' हा आधुनिक भारताचा १८ वर्षे वयाचा तरुण तडफदार मुलगा दाखविला आहे. केवळ दलित कुटुंबात जन्माला आल्यामुळे त्यांस भंगी काम करावे लागत आहे. गुलामगारापेक्षाही कमी दर्जाची अवहेलना तो सहन करत असल्याचे दिसते. कारण गुलामाला गुलामगिरीतून मुक्ती मिळू शकते, परंतु पददलित हा पददलितच रहात असून धर्म आणि समाज त्याचा तिरस्कारच करतो. (श्रीवास्तव २०११:१७) बाखा यास वाचनाची आणि लिहिण्याची मनापासून आवड व तीव्र इच्छा होती. परंतु केवळ अस्पृश्य असल्याने त्यास शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात आला. सिगारेटचे पाकिट किंवा मिठाईच्या दुकानातून जिलेबी विकत घेताना दोन्ही दुकानदार त्याच्या हाताचा स्पर्श टाळण्यासाठी सिगारेटचे पाकीट व जिलेबी दुरूनच त्याच्या हातावर टाकत असे. हिंदू समाजातील लोकांनी त्याची डुक्कर, कुत्रा असे अपशब्द वापरुन अवहेलना केलेली आहे.

डॉ. भावनी भट्टाचार्यांनी 'ही हु राईडस् द टाईगर' (१९८४) या कांदबरीत बंगालमधील दुष्काळाच्या कालावधीत मंगलनामक सोनाराचे स्वतःच्या उदर निर्वाहासाठी जनतेची केलेल्या फसवणूकीचे प्रक्षेपण केलेले आहे. त्याने स्वतःची सोनार असलेली ओळख देखील लपविलेली आहे. तरी समाज त्याबाबत निष्क्रिय राहीला. परंतु त्याने एका दलित मुलाला मंदीरात आश्रय दिल्याकारणाने मंदीराच्या ट्रस्टींनी जोरदार आक्षेप घेतला व त्यास जनतेने त्यास दगडाने ठेचून

नियतीने देखील त्याची निंदाच केली. तेथे मुन्नूचा टी.बी.च्या आजाराने मृत्यू होतो.

वयाच्या अगदी १४ व्या वर्षीच गरीबीमुळे मुन्नूला अगदी माफक जीवनाच्या अपेक्षांकरीता विविध अनुभवांना सामोरे जावे लागल्याचे दिसते. परमेश्वराला प्रार्थना करतो की, 'मला जगायचे आहे, मला माहीती करून घ्यायची आहे, मला काम करायचे आहे.' जीवनाचा पहिला धडा मुन्नूस शहरातील नथूराम यांच्या घरी अनुभवास येतो. त्याच्या लक्षात येते की, त्यास गुलाम झालेच पाहिजे, नोकर म्हणून त्यास विविध प्रकारचे काम केलेच पाहिजे व हे करतांना कोणीतरी शिव्या देणारच, आणि मारणारच

अरुणधती रॉय लिखीत 'दि गॉड ऑफ स्मॉल थींग्ज' या १९९७ मध्ये बुकर पुरस्काराने सन्मानीत केलेल्या कादंबरीत अरुणधतींनी राजकीय परिस्थिती, धर्म आणि अस्पृश्येतवर प्रकाश टाकलेला आहे. भारतात अस्पृश्यांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीचे चित्रीकरण करून व्हेलुभा या व्यक्तिरेखेद्वारे पददलितांच्या परिस्थितीचे विश्लेषण केले आहे. त्यास लेखिकेने गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज असे संबोधलेले आहे. व्हेल्युथा अस्पृश्य असला तरी सुतार काम करून नवीन वस्तू निर्माण करण्याच्या ध्यासातून त्याने लाकडापासून असंख्य कलाकृती तयार केल्या. परंतु तो अस्पृश्य असल्यामुळे समाजाने त्या कलाकृती स्विकारल्या नाहीत म्हणजेच हिंदू व ख्रिश्चन यांच्याकडून अस्पृश्यांची अवलेहना केली जात असे. (पांडया, कोमल २०११:३६)

* * *

स्वातंत्र्योत्तर कालखंडात प्रस्थापित मराठी साहित्यात अनेकविध प्रवाह निर्माण झाले. उदा.दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, नागर साहित्य, देशी साहित्य, जनसाहित्य, समाजवादी साहित्य इ. या सर्व साहित्य प्रवाहांनी प्रस्थापित मराठी साहित्याला आलेली मरगळ आणि साचलेपण नष्ट करण्याची महत्त्वाची भूमिका बजावली. या सर्व साहित्य प्रवाहामध्ये पुरोगामी, परिवर्तनशील आणि माणुसकी हे मूल्य शिरोधार्य मानणारे जर कोणते प्रवाह असतील तर ते दलित आणि ग्रामीण साहित्याचे होत. ग्रामीण आणि दलित या दोन संज्ञा आज साहित्य विश्वात स्थिर झालेल्या आहेत.

ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य या दोन्ही साहित्यांचा मूळ विषय आहे शोषणाधिष्ठित माणूस या शोषणाधिष्ठित माणसाला शोषणमुक्त करणे. त्याला नवा अवकाश उपलब्ध करून देणे होय. शोषणविरहित समाजाची निर्मिती करणे होय. माणुसकी हे मूल्य ग्रामीण आणि दलित हे दोन्ही साहित्यप्रवाह शिरोधार्य मानतात. स्वातंत्र्य–समता–बंधुभाव या त्रयीवर या प्रवाहांची नितांत श्रद्धा आहे. प्रस्तुत ग्रंथात दलित आणि ग्रामीण कादंबरीचा तुलनात्मक विचार मांडला असून ग्रामीण आणि दलित कादंबरीची मूळ प्रेरणा शोषण विरहित समाजाची निर्मिती करणे हीच आहे. 'मराठी दलित ग्रामीण कादंबरी' तुलना हा ग्रंथ रसिक वाचकांना मोलाचा व मार्गदर्शक ठरेल असाच आहे.

शशिकांत साळवे



मंदीराच्या बाहेर काढण्याचे विदारक चित्रण लेखकाने केल्याचे दिसते.

दलितांनी प्रेम करणे हा देखील गुन्हा मानला जातो. याचे विवरण अरुणधती रॉय यांनी 'गॉड ऑफ स्मॉल थींग्स्' या अलिकडच्या कादंबरीत केलेले आहे. वेलुथा नामक दलित माणसाने ब्राम्हण विधवेशी प्रेम संबंध ठेवल्याने त्यास जीवनाची आहुती द्यावी लागली असून त्यावर अरुणधतींनी प्रकाश टाकलेला आहे.

दलित व अस्पृश्य हे शब्द समानअर्थी असून धर्माच्या नावाखाली राजकीय व आर्थिक पिळवणूक झालेल्या व्यक्तिंना अनुसरुन वापरले जातात. म्हणून दलित ही जात नसून त्याद्वारे बदल व क्रांती अपेक्षीत आहे. दलित वाङ्मयाचा मुख्य हेतू दलितांच्या दयनीय अवस्थेचे चित्रण व दलितांच्या बंद आवाजास वाचा फोडणे होय. 'कुली' मधील मुन्नु खेडवळ मुलगा उदारनिर्वाहासाठी घराच्या बाहेर पडतो त्यासाठी त्याने वेगवेगळ्या ठिकाणी काम केले. परंतु समाजाने त्यास आनंद हा जीवनाचा मूलभूत हक्क मिळू दिला नाही. त्याच्या प्रालब्धाने मात्र मुन्नू गुलामगिरीचा बळी ठरला आहे. जमीनदाराने मुन्नूच्या वडीलांची पाच एकर जमीन गिळंकृत केली. त्यातून निराश्येच्या धक्क्याने त्याचा झालेला मृत्यू, मुलाच्या पालन पोषणासाठी आईवर आलेली भिक मागण्याची वेळ हे सर्व मुन्नूने अनुभवले आहे.

मुल्कराज आनंदाच्या कुली (१९३६) या कादंबरीत सामाजिक दांभिकता, वर्णद्वेष, सामाजिक व आर्थिक अन्याय, श्रीमंत व गरीब यातील दरी, अस्पृश्यांची हिंदू सवर्णांकडून होणारी अवहेलना या सर्वांचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. कथानकातील नायक, मुन्नू, प्रामाणिक उदार परंतु बंडखोर वृत्तीचा असून निश्चयी स्वभावाचा आहे. त्याच्या निश्चय व धैर्याला गुलामगिरीमुळे नेहमीच तडा गेलेला दिसतो. मुन्नू शामनगर येथे बाबुनथूरामच्या घरी नोकर म्हणून काम करताना मालकाच्या तिखट स्वभावाच्या बायकोला कंटाळून काम सोडतो, त्यानंतर प्रभा दयाळ यांच्या पिकल कारखान्यात कामगार म्हणून कामास सुरूवात करतो ना करतो तोच कारखाना दिवाळखोरीत निघाल्याने बंद पडतो. भाजी मार्केटमध्ये हमाली, सर्कशीतील मित्रांबरोबर मुंबई येथे जाऊन एका मिलमध्ये अल्पशा पगाराची नोकरी पत्करतो. कामगारांना होणाऱ्या त्रासातून ते संघटित होतात आणि त्यातून होणाऱ्या जातीय संघर्षामुळे काम सोडून श्रीमती मेनस्प्रींग बरोबर सिमला येथे जाऊन नोकर म्हणून कामास सुरूवात करतो. परंतु